# महाराष्ट्रात हक्क मराठीचा!

*मराठी भाषा अभिजात आहे म्हणून समाजरूपी 'कपाटात ती शोभेच्या वस्तूसारखी बंद करून ठेवणार आहोत का आपण? ती रुजली नि आमच्या मातीच्या कणाकणांतून फुलली तरी ती वाढणे आणि बहरणे हे खूप महत्त्वाचे आहे. ती कशी वाढवायची याचा उत्तम आदर्श शिवाजी राजांनी घालून दिला. फार्सीचे मराठीवरील आक्रमण रोखण्यासाठी त्यांनी अनेक दिशांनी प्रयत्न केले. राज्य व्यवहार कोश करून घेतला. स्वतःची नाममुद्रा निर्माण केली. आपला राज्य कारभार मराठीतून व्हावा, यावर भर दिला आणि तसे आदेश दिले. 'आज्ञापत्रे' हे याचे उत्तम उदाहरण. भाषाप्रदूषण थांबवण्याकरिता स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी नवनवीन शब्द निर्माण केले. मराठी ही अतिशय लवचिक भाषा आहे. अनेक शब्द छटांनी समृद्ध असा तिचा विपुल शब्दसंग्रह आहे. प्रत्येक काळाला समांतर राहून विविध क्षेत्रांत आलेल्या नवनवीन शब्दांसाठी नवे शब्द निर्माण करण्यासाठी पुढाकार घेणे ही मराठी भाषक समाज म्हणून आपली जबाबदारी आहे. मराठी भाषक समाज म्हणून आपल्या काय-काय जबाबदाऱ्या आहेत, हे आपण आजवर किती आस्थेने जाणून घेतले, हा प्रश्न विचारायची वेळ निघून गेली आहे. आज पहिलीपासून तिसरी भाषा मुलांवर लादणे आणि त्यासाठी हिंदीसमोर शासनाने पायघड्या घालणे या विषयाने सर्वत्र उग्र वादळाचे स्वरूप धारण केले आहे. कितीतरी वर्षांनी मराठी विषयीच्या अस्वस्थतेने समाज ढवळून निघाला आहे. पाचवीपासून विद्यार्थी शालेय जीवनात अगदी व्यवस्थित हिंदी शिकतच होते. हे सर्व अचानक बदलण्याचा घाट शासनाने घालू नये. यातून मराठी आणि हिंदी या दोन भाषांमध्ये तेढ वाढण्याखेरीज दुसरे काहीही हाती लागणार नाही. आपल्याच भूमीतल्या भाषांना वैरी म्हणून एकमेकींसमोर उभे करून काय साध्य होणार? खरं तर मराठी इतकी सक्षम आहे की, अन्य कोणतीही भाषा तिला संपवू शकत नाही. पण आपणच जेव्हा एखाद्या भाषेला शरण जातो तेव्हा ती परकी भाषा आपल्या भाषेचा अवकाश कसा गिळंकृत करते, हे आपण इंग्रजीमुळे अनुभवलेच आहे. भाषावार प्रांतरचनेने त्या-त्या राज्याच्या भाषेला तिचा हक्क मिळवून दिला आहे. त्या-त्या राज्यात तेथील भाषा अबाधित ठेवण्याची जबाबदारी त्या-त्या राज्य शासनाने घेतलीच पाहिजे. महाराष्ट्रात तो हक्क मराठीचा आहे. तिच्या विकासासाठी भरीव अनुदान उपलब्ध करून देणे, शिष्यवृत्त्या देणे, प्रकल्प उभे करणे, त्यासाठी निधी उपलब्ध करून देणे, विविध विद्यापीठांशी जोडून घेणे, शालेय आणि उच्च शिक्षणात तिचे स्थान अग्रक्रमावर ठेवणे, नोकऱ्यांमध्ये मराठी भाषेचा अभ्यास केलेल्या विद्यार्थ्यांकरिता तरतुदी करणे या दिशेने शासनाने गंभीरपणे पावले उचलण्याची वेळ आली आहे. आपण मराठीच्या बाजूने ठामपणे उभे आहोत, हे सिद्ध करणारे सकारात्मक काम मायबाप सरकारने हाती घ्यावे आणि त्याकरिता समंजस पाऊल म्हणून 'हिंदी सक्तीच्या' विषयावरून उठलेले हे वादळ त्वरित शमवावे. अभिजात मराठीचा हा गौरव ठरेल!*




# सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ताकतीने लढून जिंकायच्याच-आ. कराड

**(पान १ वरून)** अभूतपूर्व आणीबाणी लागू केली या आणीबाणी विरोधात आवाज उठवणाऱ्या देशभरातील हजारों जणांना तुरुंगात टाकले या घटनेला पन्नास वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने कारावास भोगलेले चळवळीतील कार्यकर्ते प्रदीप पाटील खंडापूरकर यांचा लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाच्या वतीने आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते यथोचित सत्कार करून सन्मान करण्यात आला.

यावेळी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आ रमेशअप्पा कराड म्हणाले की, निष्ठेने, कष्टाने, तुम्हा सर्व कार्यकर्त्यांच्या जिद्दीने आपण ग्रामीण मतदार संघात यश मिळविले. मिळालेले यश टिकले पाहिजे यासाठी कार्यकर्त्यांची जबाबदारी वाढलेली आहे याची जाणीव ठेवून जबाबदारीने वागले पाहिजे, गोरगरीब सर्व सामान्य माणसाच्या अडीअडचणी सोडविण्या साठी प्रयत्न करावेत. शासनाच्या विविध विभागामार्फत प्रत्येक गावागावात विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी मिळवून दिला याची जाणीव करून द्यावी असे बोलून दाखवले.

मतदार संघातील आणीबाणी उठविण्याचे काम झाले आहे आता लोकशाही टिकवण्यासाठी सर्वांनी मेहनत घ्यावी असे सांगून भाजपासाठी अत्यंत चांगले वातावरण आहे महायुतीतील सहकारी पक्षांना सोबत घेऊन मतदार संघातील जिल्हा परिषदेच्या सर्व जागा आणि लातूर रेणापूर पंचायत समिती बरोबरच रेणापूरची नगरपंचायत भाजपाच्या ताब्यात आली पाहिजे यासाठी सर्वांनी आत्तापासून कामाला लागून प्रयत्न करावेत असे आवाहन केले.

यावेळी प्रदीप पाटील खंडापूरकर यांनी आणीबाणीच्या काळातील विविध घटनांना उजाळा दिला. जनतेच्या अडीअडचणीला धावून येणारे, गरजवंतांना मदत करणारे आणि कसलीही अपेक्षा न ठेवता कायम जनतेच्या संपर्कात असणारे आमदार रमेशआप्पांच्या रूपाने लाभले आहेत हेच आपले भाग्य आहे असे बोलून दाखवले.

प्रारंभी विक्रमकाका शिंदे यांनी बैठकीचे प्रास्ताविक करून आघाडी काळात होणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार संघाचा आढावा घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी नवनाथ भोसले यांनी आभार मानले. या बैठकीस लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्र भाजपा प्रदेश अध्यक्षपदी रविंद्र चव्हाण

**(पान १ वरून)** भाजपा परिवाराचा मूलमंत्र अनुसरून, अंत्योदयाच्या मार्गावर आजवर वाटचाल करत आलो. या वाटचालीत पक्षश्रेष्ठींचे मार्गदर्शन, पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोलाची साथ आणि जनतेचे आशीर्वाद लाभले. या शुभेच्छा आणि आशीर्वादाच्या पाठबळावर आज भाजपा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज केंद्रीय मंत्री किरेनजी रिजिजू यांच्याकडे सुपूर्द केला. यापुढच्या वाटचालीत देखील तुम्हा सर्वांचे आशीर्वाद मोलाचे ठरणार आहेत,' असे रविंद्र चव्हाण म्हणाले.

## विविध प्रश्न तत्परतेने मार्गी लावून नागरिकांना दिलासा द्यावा ;अन्यथा तिव्र आंदोलनचा इशारा

**(पान १ वरून)** मार्फत तांडा व दलीत वस्ती सुधार योजनेतील प्रस्तावाला मंजुरी मिळणे, निराधार,वृध्दापकाळ, दिव्यांग व सामाजिक सुरक्षा योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मिळणारे मासिक मानधन/पगार अनेक महिन्यांपासून थकले आहे.

विविध प्रश्नांमुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे त्यामुळे ही अडचण दुर करून गोर-गरीब जनतेला दिलासा देण्यात यावा अशा स्वरूपाच्या मागण्या संबंधित विभागाकडे करण्यात आल्या आहेत. या सर्व मागण्यांचा सहानुभूती पुर्वक विचार करून तात्काळ या मागण्या पूर्ण कराव्यात अशी मागणी शिष्टमंडळाने केली असून मागणी मान्य नाही झाल्यास तिव्र आंदोलन केले जाईल असा इशारा दिला आहे.

यावेळी सुभाष घोडके, प्रमोद जाधव,जगदीश बावणे, सुनील पडीले, संतोष देशमुख, माधव गंभीरे,शिवाजी पदम पाटील, डॉ.बालाजी वाघमारे, संगीता काळे, संजय पाटील, शिवाजीराव बावगे, दीपक जगदाळे, अनिल गायकवाड, लक्ष्मण सपाटे, बलभीम शिंदे, तानाजी देशमुख, अनिल पाटील,रसूल पटेल, दिनकर साळुंखे, सुहास कदम, विलास भिसे, बिभीषन कदम, गुरुनाथ गवळी, गोविंद पाटील, बाळासाहेब करमोडे, अमित पाटील, शिवराज बिडवे, आंबेकर नारायण, खोसे विलास, प्रताप पाटील,दगडू साहेब पडीले, हनुमंत पवार, बाळासाहेब कदम, आनंद पाटील, गणेश ढगे,प्रवीण पाटील, राजकुमार पाटील, बाळकृष्ण माने, जगदीश बावणे,शेख फरमान, पांडुरंग वीर, रमेश पाटील, सहदेव मस्के, श्रीनिवास शेळके, विपिन गवरे, रणजीत पाटील, प्रकाश सूर्यवंशी, उमेश बेद्रे, राजेसाहेब सवई, शेषराव हाके, अजित शिंदे, गोविंद बोराडे, रवींद्र काळे, लक्ष्मण मोरे, बळीराम साळुंखे,झाडके भैरवनाथ, धनंजय देशमुख, श्रीकृष्ण काळे, मदन भिसे, गोपाळ बंडे, श्रीकांत बैल आदींची उपस्थिती होती

## जरांगेंची २९ ऑगस्टला 'चलो मुंबई'हाक

**(पान १ वरून)** दोन वर्षे मराठा समाजाला आंदोलन करून काय मिळालं? आता काय मिळवायचं? या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. तसेच २९ ऑगस्टच्या मुंबई आंदोलनाच्या नियोजनाबाबत या बैठकीत चर्चा झाली.

मराठ्यांची लाट काय असते, हे मुंबईत आल्यावर बघा, इथून १० ते १२ लाख लोक निघाले पाहिजेत, पाऊस पाणी बघू नका. फक्त तुम्ही सर्व जण माझ्या मागे राहा, मी बघतोच की हे आरक्षण कसे देत नाहीत. २७ ऑगस्ट रोजी मुंबईकडे कूच करायचं आहे. फक्त माझ्यावर एवढ्या वेळेस विश्वास ठेवा, एक इंच सुद्धा मागे हटणार नाही. मराठ्यांनी आता हुशार व्हा, आपल्या बाजूने विजयाची चाहूल लागली आहे. त्यामुळे घरी थांबायचं नाही. तुमच्या ताकदीशिवाय कोणालाही विजय मिळवता येत नाही, आतापासून मुंबईला जाण्याच्या तयारी लागा, घरोघरी जाऊन सांगा, असं आवाहनही जरांगेंनी मराठा बांधवाना केलं आहे.

आंतरवलीतून २७ ऑगस्टला निघाल्यानंतर शहागड, पैठण, शेवगाव, पांढरीपूल, अहिल्यानगर, नेप्टी नाका मार्गे आळेफाटा, शिवनेरी दर्शन, माळशेज घाट, कल्याण, वाशी, चेंबूर, मंत्रालय असा मुंबईत जाण्याचा मार्ग असेल. याला पर्यायी मार्ग पैठण, गंगापूर, वैजापूर, येवला, नाशिक आणि मुंबई असा असणार आहे


# नगरपंचायत कार्यालय,

रेणापूर जि. लातूर

दुरध्वनी क्रं (०२३८२) २९४४०२ E-mail id-nprenapurgmail.com

जा.क्र/नपरे/आस्था/कावि-४२३/२०२५. दिनांक ०१.०७.२०२५

## जाहिर सुचना

रेणापूर नगर पंचायत हद्दीतील सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम-२०१५ अंतर्गत नगर पंचायत रेणापूर मार्फत देण्यात येणा-या ६४ सेवांच्या यादीची अधिसुचना ही महाराष्ट्र शासन राजपत्र, गुरूवार ते बुधवार, जुन १९-२५, २०२५ जेष्ठ/आषाढ २९-४, शके १९४७ मध्ये प्रकाशित करण्यात आली आहे. सदरील अधिसुचना नगर पंचायत रेणापूरच्या (http://mahaulb.in/PortalSite/app/Home) संकेतस्थळावर तसेच नगर पंचायत कार्यालयात नागरिकांच्या माहितीसाठी डकविण्यात आली आहे. यांची सर्वांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरीत/-
**मुख्याधिकारी**
नगर पंचायत रेणापूर

स्वाक्षरीत/-
**प्रशासक**
नगर पंचायत रेणापूर